# सावरकरांच्या साहित्याचे 'ई-बुक'

## 'बुकगंगा' वेबसाइटवर मोफत उपलब्ध

**म. टा. प्रतिनिधी**

स्वातंत्र्यवीर विनायक सावरकर यांचे विचार अधिकाधिक तरुणांपर्यंत पोहोचावेत, या उद्देशाने स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक ट्रस्टतर्फे त्यांनी लिहिलेली सर्व पुस्तके 'बुक गंगा डॉट कॉम' या वेबसाइटवर मोफत उपलब्ध करण्यात आली आहेत.



गेल्या काही वर्षांत 'ई-बुक' ही संकल्पना स्थानिक भाषांमध्येही लोकप्रिय होत असून, विशेषतः जगाच्या कानाकोपऱ्यात वास्तव्यास असलेला तरुण वर्गाचा यात मोठा सहभाग आहे. वेबसाइटवरून पुस्तके डाऊनलोड करून त्यांचा संगणकावर संग्रह करायचा आणि फावल्या वेळेत वाचन करायचे, ही तरुणांची सवय असल्याने ई-पुस्तकांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळतो आहे. त्यामुळे स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे साहित्य, त्यांचे विचार अधिकाधिक तरुणांनी वाचून ते आत्मसात करावेत, यासाठी स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक ट्रस्टने त्यांची सर्व पुस्तके वेबसाइटवर मोफत उपलब्ध केली आहेत. विविध क्षेत्रांतील प्रसिद्ध मराठी पुस्तकांचा समावेश असलेल्या www.bookganga.com या वेबसाइटवर हे ग्रंथ अपलोड करण्यात आले आहेत. यात १८५७ चे स्वातंत्र्यसमर या खंडाचे चार भाग, सावरकरांचे निवेदन, कविता, स्फूट लेख, सावरकरांची सामाजिक भाषणे, आता मृत्यूचे स्वागत करावे, आत्मचरित्र : माझ्या आठवणी, अंदमानाच्या अंधेरीतून, बोधी वृक्ष, हिंदूराष्ट्र दर्शन या अशा ६०हून अधिक पुस्तकांचा समावेश असून द रेव्हल्यूशनिस्ट टू हिमसेल्फ आणि इंडियन वॉर ऑफ इंडिपेंडन्स या इंग्रजीतील खंडही मोफत उपलब्ध करण्यात आले आहेत.

वाचण्यास अतिशय सुटसुटीत आणि आकर्षक मांडणी असल्यामुळे या ई-पुस्तकांना विविध भागांतील मराठी नागरिकांचा या संकल्पनेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून, अनेकांनी ही पुस्तके संग्रहासाठी डाऊनलोड करून घेतली आहेत, अशी माहिती 'बुकगंगा डॉटकॉम'चे मयुरेश जोगळेकर यांनी 'मटा'शी बोलताना दिली.